

पक्ष्यांचा शिकारी

इंडोनेशियाची लोककथा

लेखन: चिआ हार्न चेक


पक्ष्यांचा शिकारी

इंडोनेशियाची लोककथा

मराठी अनुवाद: सुशील चव्हाण



राजा *इशाक* याला धनुर्विद्येचा मोठा शौक होता. मित्रांशी गप्पा-टप्पा मारताना राजा इशाक फक्त आणि फक्त धनुष्य आणि बाण यांच्याविषयीच बोलत असे. अगदी दिवसभर त्याचे या विषयावर पाल्हाळ सुरू असे. लवकरच, राज्यातील प्रत्येकाला राजाच्या धनुर्विद्येविषयी असलेल्या वेडाबद्दल कळले.



राजा इशाकला एक लावण्यवती मुलगी होती. तिचे नाव होते, *बिनतांग देवी.*

ती फारच सुंदर होती. प्रत्येक तरूण तिच्याशी लग्न करायला इच्छुक होता.

पण राजाने स्पष्ट केले होते की देशातील सर्वोत्कृष्ट धनुर्धाऱ्याशीच तो आपल्या मुलीचे लग्न लावून देणार.





राजाने एके दिवशी मुलीचे लग्न जमवण्यासाठी धनुर्विद्येची स्पर्धा आयोजीत करायचे ठरवले.

दूरदूरवरून अनेक धनुर्धारी या स्पर्धेत भाग घेण्यासाठी राज्यात पोहोचले.

पण कुणीही जिंकू शकले नाही, कारण इतक्या लोकांमध्ये राजाला एकही महान धनुर्धारी मिळाला नाही.



राज्यात *वजान* नावाचा एक गरीब शिकारी राहात होता. उदरनिर्वाहासाठी तो पक्ष्यांची शिकार करत असे.

शिकाऱ्याने ऐकले की राजा इशाकला एक सुंदर मुलगी आहे आणि तिचे लग्न राजा एखाद्या कुशल धनुर्धाऱ्याशीच लावून देणार आहे.

वजानने विचार केला की त्याचे लग्न राजकन्येशी झाले तर बहार येईल. मग त्याने एक चलाख योजना बनवली.

त्याने जाळे टाकून काही जंगली पक्ष्यांना पकडले.

मग त्याने त्या पक्ष्यांना ठार केले आणि प्रत्येक पक्ष्याचा उजवा डोळा काढला.

वजानने त्या पक्ष्यांना एका दोराने बांधून एका काठीला लटकवले.

मग तो राजवाड्याकडे निघाला.

रस्त्यात तो ओरडू लागला, “एका डोळ्याचा पक्षी घ्या हो!” मुले त्याच्या मागेमागे धावू लागली. त्यांनी कधी कुणाला एका डोळ्याचा पक्षी विकताना पाहिले नव्हते.



चालता-चालता वजान सतत ओरडत होता, “एका डोळ्याचा पक्षी घ्या हो! एका डोळ्याचा पक्षी घ्या हो!”

अखेरीस, तो राजवाड्याच्या दारावर पोहोचला. राजाने दारावर मुलांचा घोळका बघितला. त्याने त्याचे कारण जाणून घेण्यासाठी आपल्या नोकराला पाठवले.





नोकर परतून म्हणाला, “महाराज, एक गरीब पक्ष्यांचा शिकारी आलाय. तो एका डोळ्याचे पक्षी विकतोय.”

हे ऐकून राजा म्हणाला, “त्याला तात्काळ माझ्याकडे घेऊन ये.”

मग वजानला राजासमोर उभे करण्यात आले.

“तू जे पक्षी विकतोयस त्यांना म्हणे एकच डोळा आहे, खरंय का हे?” राजा इशाकने विचारले.

“होय, महाराज, मी माझ्या धनुष्यबाणाने नेहमी पक्ष्यांच्या डोळ्यातच तीर मारतो,” गरीब शिकारी उत्तरला.

राजा इशाकला मोठे नवल वाटले. त्याचा आपल्या कानांवर विश्वासच बसेना. “तरूण शिकाऱ्या, पक्ष्यांच्या डोळ्यात बाण मारणं, हे काही सोपं काम नाही. तू राज्यातला सर्वोत्तम शिकारी असावास,” राजा म्हणाला.

“तुझ्यासारख्या महान धनुर्धाऱ्याची पत्नीही सुंदर हवी. तू माझ्या मुलीशी लग्न करशील का?”

गरीब शिकाऱ्याने तात्काळ होकार दिला, “पण महाराज, मी तर एक गरीब शिकारी आहे. आपल्या मुलीला राजवाड्यासारखे ऐषोआराम देण्यासाठी मी पैसा कुठून आणू?”





“अरे, तू फक्त महान धनुर्धारीच नाहीस, तर एक प्रामाणिक माणूससुद्धा आहेस. हे बघ, मी राजा आहे. तुझ्या गरजेपुरता पैसा मी तुला सहज देऊ शकतो. आणि घराचं म्हणशील, तर तू माझ्या राजवाड्यात राहू शकतोस,” राजा म्हणाला.

हे ऐकून वजानला आनंद झाला. पण तो चेहऱ्यावर न दाखवण्याची त्याने काळजी घेतली.

काही दिवसांनी, वजानचे राजकन्येशी लग्न झाले.

वजानला दिलेले नवे कपडे त्याने परिधान केले.

आता तो स्वत:वरच खुश होता.

अखेरीस, त्याची मनोकामना पूर्ण झाली होती.

आता त्याच्याकडे सर्व काही होते – पत्नी म्हणून सुंदर राजकन्या आणि घर म्हणून भव्य राजवाडा.





लग्नाची मोठी मेजवानी देण्यात आली.

राजा इशाकने आपल्या अनेक मित्रांना आमंत्रण दिले.


तो दिवस फार सुंदर होता.

आभाळात हिरव्या रंगाचे पक्षी उडत होते.

भोजन अतिशय रुचकर होते आणि वादक अत्यंत श्रवणीय संगीत वाजवत होते.

सर्व लोक मेजवानीचा आस्वाद लुटत होते.

अचानक, अतिउत्साहीत होऊन, राजा इशाक उसळून म्हणाला, “ऐका! आता माझे जावई, महान धनुर्धारी आपल्याला त्याचे धनुष्यबाणाचे कौशल्य दाखवतील.”



हे ऐकून वजान जवळजवळ बेशुद्धच पडला.

या धक्क्यातून स्वत:ला सावरत तो म्हणाला, “ महाराज, मला माझे कौशल्य दाखवायला नक्कीच आवडेल, पण आत्ता ते शक्य होणार नाही, कारण इथे येताना मी माझे धनुष्यबाण घरीच ठेवून आलोय.”

वजानला वाटले की त्याने राजाला चतुरपणे उत्तर दिले.

पण राजाने माघार घेतली नाही. तो म्हणाला, “त्याने काही फरक पडत नाही. तू माझे धनुष्यबाण वापरू शकतोस.” मग राजाने आपला धनुष्यबाण आणायला एका नोकराला पाठवले.

वजान थरथर कापू लागला. थोड्याच वेळात सर्वांसमोर आपले पितळ उघडे पडणार, हे त्याला कळून चुकले.

नोकर राजाचे धनुष्यबाण घेऊन परतला आणि राजा इशाकने ते शिकाऱ्याच्या हाती सोपवले.

“हे घे,” राजा म्हणाला, “दाखव आम्हाला तुझं कौशल्य.”





यापूर्वी वजानने कधीच धनुष्यबाण वापरले नव्हते. त्याने धनुष्याची दोरी हळूहळू ताणली आणि बाण आभाळाच्या दिशेने रोखला. त्याला बाण सोडायची भीती वाटू लागली. तो नुसताच स्तब्ध उभा राहिला.

आभाळभर पक्षी उडत होते, पण महान धनुर्धारी बाण सोडून पक्ष्यांना खाली पाडत नव्हता. लोकांना नवल वाटू लागले.

काही लोक वजानची ही दयनीय अवस्था पाहून उघडपणे हसू लागले.

एकजण म्हणाला, “बघा, तो घाबरलाय. त्याला धनुष्यबाण नीट धरतासुद्धा येत नाही!”



शेवटी, लोकांपैकी एका माणसाचा संयम संपला. पुढे होऊन त्याने शिकाऱ्याच्या पाठीत धपाटा घातला आणि तो म्हणाला, “अरे, महान धनुर्धाऱ्या, आतातरी बाण सोड!”

पाठीवर पडलेल्या धपाट्याने वजानच्या हातून बाण सुटला. आभाळात एक सारस पक्षी उडत होता, त्याला बाण लागला. मृतप्राय होऊन सारस खाली जमिनीवर पडला.





राजा इशाकने पक्षी हातात घेतला. बाण सारसच्या अरुंद मानेतून आत घुसला होता. राजाला आश्चर्य वाटले.

“खरंच, तू या देशाचा सर्वात महान धनुर्धारी आहेस,” राजा म्हणाला.

सगळे लोक थक्क झाले. पण वजानने चेहऱ्यावर नाराजी दाखवली.

“यानंतर मी पुन्हा कधीच धनुष्यबाणाला स्पर्श करणार नाही.,” तो मोठ्या आवाजात म्हणाला, “मी बाणाने नेहमी पक्ष्याचा डोळा भेदतो, मान नाही. या माणसाने माझ्या पाठीत धपाटा घातला नसता, तर माझ्या बाणाने निश्चितच सारसचा डोळा भेदला असता.”

राजाने शिकाऱ्याच्या पाठीत धपाटा घालणाऱ्या त्या माणसाला तात्काळ शिक्षा फर्मावली.



त्यानंतर वजानने धनुष्यबाणाला कधीच स्पर्श केला नाही. यामुळे सर्व लोक त्यालाच राज्यातील सर्वात महान धनुर्धारी मानतात.

समाप्त